# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

**Date – 19 June 2025**

**Time 18.10 to 18.20**

**Language Marathi**

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १९ जून २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- QS वर्ल्ड युनिव्हर्सिटी क्रमवारीत भारतातल्या ५४ शैक्षणिक संस्थांना स्थान
- विकासाधीन प्रकल्पांचं विहित कालमर्यादेत भूसंपादन करून प्रकल्प मार्गी लावण्याची मुख्यमंत्र्यांची सूचना
- संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचं आज आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे प्रस्थान
- आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर इथं विशेष जनजागृती कार्यक्रम

आणि

- मराठवाड्यात बहुतांश जिल्ह्यांना आज हवामान विभागाचा यलो अलर्ट

****

QS वर्ल्ड युनिव्हर्सिटी क्रमवारीत भारतातल्या ५४ शैक्षणिक संस्थांना स्थान मिळालं आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या पोस्टमधून ही माहिती दिली. या क्रमवारीत इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी–IIT दिल्ली या संस्थेनं १२३ वा तर आयआयटी मुंबईने १२९वा क्रमांक मिळवला. या दोन्ही संस्थांनी देशात अनुक्रमे पहिला आणि दुसरा क्रमांक पटकावला आहे. २०१४ मध्ये भारतातल्या फक्त ११ विद्यापीठांना QS क्रमवारीत स्थान होतं आता यामध्ये लक्षणीय वाढ झाल्याचं प्रधान यांनी नमूद केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या क्रमवारीत भारतीय संस्थांच्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त केलं आहे

****

पंचायती राज मंत्रालय आणि इलेक्ट्रॉनिक्स तथा माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचं कृत्रिम बुद्धीमत्ता व्यासपीठ –भाषिनी यांच्या दरम्यान आज सामंजस्य करार करण्यात आला. नवी दिल्लीत पंचायती राज राज्य मंत्री एस पी बघेल यांच्या उपस्थितीत झालेल्या या करारामुळे भाषेसंबंधीच्या अडचणी दूर होण्यासह देशभरातल्या सर्व राज्यांमध्ये भाषेच्या आधारे एकरुपता आणण्याच्या प्रयत्नांना चालना मिळणार आहे. पंचायती राज संस्थांना सशक्त करणं, लोकशाही व्यवस्थेला सक्षम आणि मजबूत करण्यासाठी ए आय सक्षम सार्वजनिक डिजिटल प्रारुप आराखड्याच्या वापराला चालना देणं हा या सामंजस्य कराराचा उद्देश असल्याचं बघेल यांनी सांगितलं.

****

कारागृहांमधील विचाराधीन कैद्यांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून २०१८ मध्ये सुरू केलेल्या देशातील पहिल्या विधी सहाय्य उपक्रमाचा जवळपास २० हजार विचाराधीन कैद्यांना लाभ झाला आहे. यापैकी ४५ टक्के म्हणजे नऊ हजारावर बंदी विविध कायदेशीर प्रक्रियांद्वारे मुक्त करण्यात आले आहेत. केंद्र शासनानेही देश पातळीवर हा उपक्रम स्वीकारला आहे. अज़ीम प्रेमजी फाउंडेशन, टाटा सामाजिक विज्ञान संस्था आणि दिल्लीच्या राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या सहकार्याने राज्यात मुंबई, ठाणे, पुणे आणि लातूरसह आठ प्रमुख कारागृहात हा उपक्रम प्रभावीपणे राबवला जात आहे.

****

राज्यातील महत्त्वाच्या सर्व प्रकल्पांचं विहित कालमर्यादेत भूसंपादन करून प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहेत. राज्यातील महत्त्वाच्या प्रकल्पांच्या भूसंपादन आढावा बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. भूसंपादनाअभावी एकही प्रकल्प रखडणार नाही याची दक्षता घेण्याची सूचना मुख्यमंत्र्यांनी केली. या बैठकीत जालना – नांदेड द्रुतगती महामार्गासह राज्यातले विविध रस्ते प्रकल्प, वर्धा–नांदेड सह इतर रेल्वे प्रकल्प तर छत्रपती संभाजीनगरसह विविध विमानतळांसाठीच्या भूसंपादन प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला.

****

राज्यात प्रयोगात्मक कलांचं सखोल संशोधन आणि अभ्यास करण्यासाठी पु. ल. देशपांडे कला अकादमीत स्वतंत्र संशोधन केंद्र सुरू करण्यात येणार आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी आज मुंबईत ही माहिती दिली. राज्यातल्या आणि राज्याबाहेरच्या पदवी तसंच पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या आणि पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा लाभ होणार आहे. या केंद्राला शाहीर साबळे यांचं नाव देण्यात येणार आहे.

****

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालयाने, २०२५–२६ शैक्षणिक वर्षासाठी पोस्ट–एसएससी अर्थात दहावी नंतरच्या अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशाला मुदतवाढ देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. आता इच्छुक विद्यार्थ्यांना येत्या २६ जूनपर्यंत प्रवेश घेणार आहे.

****

पुणे जिल्ह्यात आळंदी इथून संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आज आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. आज सूर्यास्तानंतर गुरुवारची धुपारती झाल्यानंतर पालखी सोहळा प्रस्थान करणार असल्याची माहिती संस्थानच्या वतीनं देण्यात आल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

केंद्र सरकारनं गेल्या ११ वर्षात केलेल्या कामांची आषाढी वारीमध्ये माहिती देणाऱ्या वाहनाला केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पुण्यात हिरवा झेंडा दाखवला. विविध पोस्टर्स, आणि नाटिकांच्या माध्यमातून सरकारच्या कामाची माहिती दिली जाणार आहे.

****

योगासनांमध्ये सूर्यनमस्कार हा सर्वांग योग अभ्यास म्हणून ओळखला जातो. येत्या शनिवारी साजऱ्या होत असलेल्या अकराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर इथल्या योगशिक्षक डॉ स्मिता दीक्षित यांनी दिलेली सूर्यनमस्काराविषयीची माहिती आपण आज जाणून घेऊ.

**बाईट – डॉ.स्मिता दीक्षित, योगशिक्षक**

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर इथं आज विशेष जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. केंद्रीय संचार ब्यूरो, जिल्हा प्रशासन, आणि भारतीय योग संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या कार्यक्रमाअंतर्गत योग दिंडी काढण्यात आली. शिवदर्शन सांस्कृतिक शाहिरी संचाच्या योग शाहिरीचं सादरीकरण तसंच योग प्रात्यक्षिकांचं सादरीकरण यावेळी करण्यात आलं.

****

प्रसिद्ध वन्य जीव अभ्यासक, अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या पार्थिव देहावर आज सोलापूर इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पोलीस विभागाच्या वतीने बंदुकीच्या तीन फैरी हवेत झाडून चितमपल्ली यांना मानवंदना देण्यात आली. लोकप्रतिनिधी तसंच प्रशासकीय अधिकाऱ्यांनी चितमपल्ली यांच्या पार्थिव देहावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. चितमपल्ली यांचं काल वृध्दापकाळानं निधन झालं. ते ९४ वर्षांचे होते.

****

शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचं सुक्ष्म नियोजन करुन योजनांचा लाभ पात्र लाभार्थीपर्यंत पोहचवण्याची सूचना, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केली आहे. छत्रपती संभाजीनगर इथं विभागीय आढावा बैठकीत ते बोलत होते. पेन्शन अदालत, आश्वासित प्रगती योजना, अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या आदी आस्थापनाविषयक कामं गतीने मार्गी लावण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. प्रधानमंत्री आवास योजनेसह विविध योजनेअंतर्गत सुरू असलेली घरकुलांची कामं येत्या १५ ऑगस्टपर्यंत पूर्ण करून संबंधितांना घरकुल वाटप करावं, उर्वरित घरकुलांची कामे दिवाळीपूर्वी पूर्ण होतील, याबाबत नियोजन करण्याची सूचना विभागीय आयुक्तांनी केली.

****

लातूर शहरासह बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई, केज तसंच धाराशिव जिल्ह्यातील कळंब शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या मांजरा धरणात सध्या २८ टक्के इतका पाणी साठा शिल्लक आहे. मे महिन्यात झालेला अवकाळी पाऊस तसंच मान्सूनपूर्व पावसामुळे धरणातील पाणीसाठ्यात वाढ झाली असून धरणातला जिवंत पाणीसाठा ४९ पूर्णांक ४९२ दशलक्ष घनमीटर इतका झाला आहे.

****

नांदेड जिल्ह्यातल्या उमरी तालुक्यातील कौडगाव या सुमारे ६३२ लोकसंख्येच्या गावात जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर झालेली ८१ लाख ५२ हजार रुपयांची पाणीपुरवठा योजना यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली आहेत. गावातील एकूण १४३ घरांना नळ जोडणी देण्यात आली आहे. या योजनेच्या संचालनाची जबाबदारी आता ग्रामपंचायतीकडे सुपूर्द करण्यात आली आहे.

****

भारत आणि इंग्लंडदरम्यान पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेला उद्यापासून इंग्लंडमध्ये प्रारंभ होत आहे. या मालिकेतला पहिला सामना उद्यापासून लीडस् इथं खेळवला जाणार आहे.

****

हवामान

छत्रपती संभाजीनगर तसंच जालना शहरासह जिल्ह्यातल्या बहुतांश भागात आज दुपारपासून पाऊस सुरु आहे. या दोन्ही जिल्ह्यांसह परभणी, हिंगोली आणि नांदेडसह विदर्भातल्या अनेक जिल्ह्यांना आज यलो अलर्ट देण्यात आला आहे. मुंबई, नाशिक आणि कोकणाच्या काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट तर पालघर, पुणे आणि नाशिकच्या घाट परिसराला रेड अलर्ट देण्यात आला आहे.

****